## -:प्रेसनोट :-

**घरफोडी चो-या करणा-या अटटल गुन्हेगाराकडुन सात गुन्हे उघड.**

---

दिंनाक २२/१२/२०१७ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री फारुक काझी यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री समाधान कदम व तपास पथकाचे पोलीस हवालदार संतोष क्षिरसागर यांना मिळालेल्या बातमीवरुन घरफोडया चो-या करणारे अटटल गुन्हेगार १)रविसिंग शामसिंग कल्याणी वय-१९ वर्षे रा.कोठारी व्हिलजवळ बसस्टॉपचे बाजुला रामटेकडी हडपसर पुणे.२)गोविंदसिंग अंगदसिंग कल्याणी वय-२० वर्षे रा.सदर यांना येरवडा कारागृह येथुन स्वारगेट पोलीस ठाणेतील गुन्हयात वर्ग करुन घेवुन त्यांच्याकडे दाखल गुन्हयाबाबत तपास करता त्यांनी सन २०१६ व सन २०१७ मध्ये डायसप्लॉट झोपडपटटी,महर्षीनगर, सॅलिसबरी पार्क,गुलटेकडी या परिसरात घरफोडया चो-या केल्याचे कबुल केले असुन त्यांच्या कडुन घरफोडी चोरीचे स्वारगेट पोलीस ठाण्याचे एकुण सात गुन्हे उघडकीस आलेले आहेत .दाखल गुन्हयातील एकुण २३२ ग्रॅम वजनाचे ४,८८,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व १ किलो ६९० ग्रॅम वजनाचे ६३,४००/- रुपये किमतीचे चांदिच्या वस्तु व दागिने असा एकुण ५,५१,४००/- रुपायाचा घरफोडी चोरीचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हेगार हे पोलीस रेकॉर्डवरील सराईत घरफोडी करणारे गुन्हेगार असुन त्यांचेवर येरवडा,भारती विदयापीठ,सिंहगड,सहकारनगर,मार्केटयार्ड,बिबवेवाडी पोलीस ठाण्यात यापुर्वी एकुण २० गुन्हे दाखल आहेत.दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री समाधान कदम करीत असुन वरील अटक आरोपींना दि.२८/१२/२०१७ पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंढे,शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार, स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक फारुक काझी,पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री मचिंद्र पंडित यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री समाधान कदम व तपास पथकाचे पोलीस हवालदार संतोष क्षिरसागर, सज्ज्द शेख, दशरथ गभाले, पोलीस नाईक गुरव,पोलीस शिपाई शेडगे,साळवे,भोकरे,मोरे यांनी केलेली आहे.